आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ एप्रिल २०२४ - सोमवार

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातला उमेदवारी मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात राज्यात रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या  ११ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यात नांदेड, हिंगोली, परभणी, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा आणि यवतमाळ - वाशिम या आठ मतदार संघात, येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे. या सर्व मतदार संघांमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे.

अमरावतीमध्ये आज महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची सभा झाली.

नांदेड जिल्ह्यात भोकर इथं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची महायुतीचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ सभा होणार आहे.

आकाशवाणीवरुन राजकीय पक्षांच्या निवडणूक विशेष प्रसारणाला सुरुवात झाली आहे. आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरुन दुपारी ३ वाजता प्रसारीत होणारं प्रादेशिक बातमीपत्र, उद्या दुपारी राजकीय पक्षाचं प्रसारण संपल्यानंतर प्रसारीत केलं जाईल.

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते यावेळी उपस्थित होते. नंदुरबार लोकसभा मतदारसंघातून भाजप उमेदवार डॉ. हिना गावित तसंच काँग्रेसचे

उमेदवार गोवाल पाडवी यांनी देखील आज उमेदवारी अर्ज भरला. मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांनी देखील अर्ज दाखल केला.

<><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण बारामती लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज पद्म पुरस्काराचं वितरण होणार आहे. आज राष्ट्रपती भवनात होणाऱ्या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते माजी उपराष्ट्रपती एम.वेंकैय्या नायडू तसंच भरतनाट्यम नृत्यांगना डॉक्टर पद्मा सुब्रमण्यम यांना पद्मविभूषण पुरस्कार प्रदान केले जातील. डॉक्टर बिन्देश्वर पाठक यांना मरणोत्तर पद्म विभूषण प्रदान करण्यात येणार आहे. याचबरोबर अभिनेता मिथुन चक्रवर्ती आणि गायिका उषा उथ्थप यांना पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून डॉक्टर सीताराम जिंदाल, हृदयरोग तज्ञ डॉक्टर तेजस पटेल आणि राम नाईक यांना पद्म भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

<><><><>

बुद्धीबळाच्या जागतिक स्पर्धेत १७ वर्षीय भारतीय बुद्धीबळपटू डी. गुकेश यानं ऐतिहासिक कामगिरी केली आहे. कॅनडा टोरांटो इथं झालेली फिडे कँडीडेटस्

स्पर्धा जिंकणारा तो सर्वात कमी वयाचा बुद्धीबळपटू ठरला आहे. काल झालेल्या अंतिम फेरीत गुकेशनं १४ पैकी ९ गुण मिळवले. विश्वनाथन आनंद नंतर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरणारा तो दुसरा भारतीय बुद्धीबळपटू ठरला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी समाज माध्यमावरून डी गुकेश याचं अभिनंदन केलं आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना मुंबई इंडियन्सशी होणार आहे. हा सामना जयपूरमधल्या सवाई मानसिंग स्डेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं पंजाब किंग्जचा ३ गडी राखून पराभव केला.

<><><><> मुंबई शेअर बाजारा

पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून मुंबई शहरातल्या नाल्यांमधून गाळ काढण्याचं काम वेगानं सुरु आहे. पावसाळ्यापूर्वी सुमारे १० लाख २१ हजार मेट्रिक टन गाळ काढण्याचं उद्दिष्ट ठरवण्यात आलं असून आतापर्यंत ४ लाख ८६ मेट्रिक टन गाळ काढण्यात आला आहे. गाळ काढण्याचं काम ३१ मे पर्यंत पूर्ण केलं जाईल, अशी माहिती महापालिकेनं दिली आहे.

<><><><>

नाशिक शहरातल्या जुनं नाशिक गावठाण भागात आज सकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास वाहन बाजाराला लागलेल्या आगीत आग लागली या वाहन बाजारातील सुमारे ५० दुचाक्या जळून खाक झाल्या. या आगीत या बाजाराच्या

लगतची दोन दुकानं आणि तीन घरंही भस्मसात झाली आहेत. आगीचं कारण समजू शकलं नाही.  अग्निशमन दलाच्या ९ बंबांनी आग आटोक्यात आणली.

//<><><><><>//